# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. १५० /२०२३

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृत महोत्सव निमित्ताने जनसंपर्क संस्थेची नेमणूक करण्याबाबत स्वारस्य अभिव्यक्ती आवेदन**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ देशातील एक अग्रगण्य विद्यापीठ असून **गुणवत्तापूर्ण संशोधन व शिक्षण** यात विद्यापीठाचा नावलौकीक आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ २०२३—२४ या वर्षात आपले **अमृत महोत्सवी वर्ष** साजरे करीत आहे. या निमित्ताने वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांच्या प्रसिध्दीसाठी, आवश्यक दृकश्राव्य साहित्यनिर्मितीसाठी व ब्रॅडींग बाबतच्या कार्यवाहीसाठी 'जनसंपर्क संस्थेची' नेमणूक प्रस्तावित आहे. सदर काम करण्यास इच्छूक असणा—या **जनसंपर्क संस्थेकडून स्वारस्य अभिव्यक्तीव्दारे** सहभागी होण्यासाठी आवाहन करत आहोत. याबाबत कामाचे स्वरुप, पात्रता, अटी व शर्ती सोबत जोडत आहोत.सदर कामामध्ये **स्वारस्य** असणा—या **जनसंपर्क संस्थेने ७ ऑगष्ट २०२३** पर्यंत कार्यालयीनवेळेत त्यांचे प्रस्ताव सर्वसाधारण विभाग येथे जमा करावे.

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ७. )
जा. क्र. ससा/२२८ )
दिनांक : २५/०७/२०२३ )

**कामकाजाचे स्वरुप व व्याप्ती : –**

१) अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठात आयोजित करण्यात येणा–या विविध कार्यक्रमांसाठी समाज माध्यमांव्दारे प्रसिध्दी देणे, उदा. वर्तमानपत्रे, मासिके, न्युज चॅनेल, यूटयूब, फेसबुक, ट्वीटर, इंन्स्टाग्राम, टेलिग्राम, व्हाट्सअप इ.

२) विद्यापीठ गीतानुसार डॉक्यूमेंटरी व्हिडिओ तयार करणे व प्रसिध्दी देणे.

३) विद्यापीठाची डॉक्यूमेंटरी फिल्म तयार करणे व त्याला प्रसिध्दी देणे.

४) बॅनर, भित्तीपत्रके, प्रमाणपत्रके, सोशल मिडीया साईड यासाठी डीझाईन तयार करणे.

५) प्रसिध्दीचे व त्या अनुषंगिक कामे वर्क ऑर्डर मिळाल्यापासून पुढे १वर्षापर्यंत करावयाचे आहे.

**जनसंपर्क संस्थेच्या नेमणूकीच्या पात्रतेचे निकष : –**

१) जनसंपर्क प्रसिध्दी व व्हिडिओ प्रॉडक्शनचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.

२) आर्थिक वर्ष २०२२–२३ चा वार्षिक टर्न ओव्हर कमीत कमी १ कोटी रुपयांचा असावा.

**जनसंपर्क संस्थेच्या नेमणूकीच्या अटी व शर्ती : –**

१) पूर्वी ज्या संस्थांसोबत काम केलेले आहे त्यांची यादी सोबत जोडावी.

२) विद्यापीठाकडून उपलब्ध करुन दिलेल्या जागेवरुन/ठिकाणावरुन काम करावे लागेल अथवा आपला प्रतिनिधी विद्यापीठामधे आपल्याला दिलेले कामकाज करण्यासाठी आठवड्यातून किमान २ दिवस प्रत्यक्ष हजर असेल.

३) उपरोक्त संपूर्ण कामाकरीता रु. १० लाख (सर्व करांसहित) सेवाशुल्क अदा करण्यात येईल.प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर ४ टप्प्यात रक्कम अदा केली जाईल. रक्कमेचा पहिला हप्ता प्रत्यक्ष

कामाला सुरुवात केल्यानंतर ३ महिन्याने कामकाजाचा आढावा घेवून दिला जाईल. तसेच राहिलेल्या ३ हप्त्यांच्या बाबत असेच वरीलप्रमाणे धोरण राहील.

४) कामकाज अर्ध्यावर सोडून दिल्यास कोणतीही रक्कम अदा केली जाणार नाही व अदा केलेली रक्कम सव्याज वसूल केली जाईल व विद्यापीठ ठरवेल तो दंड आकारण्याचा अधिकार व्यवस्थापनास राहिल.

५) कामात दिरंगाई केल्यास, हलगर्जीपणा केल्यास आपल्याला देय असलेल्या रक्कमेच्या १० टक्के रक्कम कपात केली जाईल.

६) विद्यापीठाची बदनामी होईल असे काम केल्यास आपणावर कायदेशीर कारवाई केली जाईल व आपणास कोणतेही देयक अदा केले जाणार नाही, व अदा केलेली रक्कम ही सव्याज वसूल केली जाईल.

७) विद्यापीठ अमृत महोत्सव समितीच्या समोर सादरीकरणानंतर कोणत्या एजन्सीला स्वीकारायचे किंवा नाकारायचे अथवा संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठ राखून ठेवत आहे.

८) कंपनीचे प्रोफाईल अर्जासोबत जोडावे.

९) आपणाला दिलेले प्रसिध्दीचे व त्याअनुषंगिक दिलेले कामकाज आपल्याला वर्क ऑर्डर मिळाल्यापासून पुढे १ वर्षापर्यंत करावयाचे आहे.

१०) ॲड ऑन वर्क देणार असाल तर तसे नमूद करावे, व काय देणार आहात त्याचे स्पष्टिकरण द्यावे.

११) ५०० रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करण्यात येईल.

१२) अमृत महोस्तव समिती समोर सादरीकरण केलेल्या एजन्सीलाच सदर काम देण्यात येईल. या सादरीकरणात आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना, डिजाईन, यापूर्वी केलेले काम यांचा समावेश असावा.

१३) कोणत्याही स्तरावर ही स्वारस्य अभिव्यक्ती रद्द करणे अथवा यातील अटी शर्ती मध्ये बदल करणे हे अधिकार विद्यापीठ राखून ठेवत आहे.

१४) या संदर्भात कोणत्याही कायदेशीर बाबी पुणे न्यायालयीन अधिकक्षेत येतील.